# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 022-68597454

Email : desk6@dtemaharashtra.gov.in internet :- www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : तंशिसं-६/लेखा/वैद्य.अग्रीम/२०२०/ ७६

दिनांक :- 04 FEB 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय :- **५ गंभीर आजारावरील वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविण्यासाठी अग्रीम प्रस्तावासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांबाबत**

संदर्भ :- १)सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : एमएजी २००५/प्र.क्र.२५१/आ.३, दि.१० फेब्रुवारी, २००६

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र. वैखप-२०१३/ प्र.क्र.२९१/१३/राकावि-२ दि.११ ऑक्टोबर,२०१३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन क्र.१ अन्वये शासकीय कर्मचाऱ्याला गंभीर आजारावर **(१. हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे २. हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया ३. ॲन्जिओप्लॅस्टी शस्त्रक्रिया ४.मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ५.कर्करोग)** शासकीय / शासनमान्य खाजगी रुग्णालयातील (संदर्भ क्र.२ नुसार) वैद्यकीय उपचाराचा खर्च भागविण्याकरिता रु.१,५०,०००/- पर्यत अग्रीम मिळण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन विभागीय कार्यालयामार्फत शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थांतील अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचेवर अवलंबित सदस्य यांच्या गंभीर आजारांवर वैद्यकीय उपचाराकरिता / शस्त्रक्रियेकरिता तातडीचा खर्च भागविण्याकरिता अग्रीम मिळणेबाबत प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येतात. सदर प्रस्ताव सादर करताना आवश्यक प्रमाणपत्रांअभावी वेळेत अग्रीम मंजूर करणे शक्य होत नाही.

तरी वैद्यकीय अग्रीमाकरिता प्रस्तावासोबत संबंधित कर्मचाऱ्याचा अर्ज खालील कागदपत्रांसह (कागदपत्रांवर संबंधित संस्था / कार्यालय प्रमुखाचे साक्षांकन आवश्यक) शस्त्रक्रिया / उपचाराच्या किमान १५ दिवस अगोदर संचालनालयास सादर करण्यात यावा, जेणेकरुन वैद्यकीय अग्रीम वेळेत मंजूर करणेबाबत कार्यवाही करणे सुलभ होईल.

**<u>वैद्यकीय उपचारासाठी अग्रीमाच्या प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे.</u>**

१)रुग्णालयाचे शस्त्रक्रियेसाठीचे अंदाजपत्रक उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या सही शिक्क्यासह. (Estimate)
२) स्थायी कर्मचारी प्रमाणपत्र
३) वैद्यकीय भत्ता दिला जात नसल्याचे प्रमाणपत्र
४) वेतन प्रमाणपत्र
५) कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र.
६) निवृत्तीवेतन घेत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (अवलंबित सदस्यांबाबत)
७) रेशनिंग कार्ड / आधार कार्डची साक्षांकित प्रत
८) आकस्मिकता प्रमाणपत्र(उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या सही शिक्क्यासह)
९) १००/- रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र.
१०)अवलंबिता प्रमाणपत्र (जोडीदाराशिवाय इतर पात्र नातेवाईकांसाठी)
११) शासकीय / निमशासकीय नोकरीत नसल्याचे प्रमाणपत्र(जोडीदाराबाबत)
१२) संस्थेचे शिफारसपत्र

तरी गंभीर आजारांवर वैद्यकीय उपचारासाठी अग्रिमाबाबत प्रस्ताव पाठविताना वरीलप्रमाणे नमूद कागदपत्रांसह सादर करण्याचे आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. सदर पत्र संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर download section मध्ये उपलब्ध आहे.

(डॉ.अभय वाघ)
**संचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.**

\\DTENS1\minister_ppt\desk 6\durgeshnew\newcircular.docx